"The voice of Labouring women"

# कष्टकरी स्त्रिया जेव्हा आवाज देतात जात्यावर न्हवं चव्हाटयावर

१९७५ साल. आंतरराष्ट्रीय महिला वर्षानिमत्त पुणे लेल्या परिषदेला जवळे कडलगहून चांगल्या २० २५ बाया आल्या हात्या. जवळजवळ सर्व शेतमजूर, विद्यार्थिनी नी थोडया शेतकरी, गृहिणी. परिषदे- गाणी, चर्चा स्वत:सहित झालेली भाषणे, डॉक्टर, सर बाईपासून ते शेतमजूर, झाडूवालीपर्यंत बरा- खेळीमेळीने, जवळकीने झालेला सहवास—या चे काही ठसे मनावर घेऊन गावी गेल्या. हे सगळे गायला नी बायांची एकी करायला पहिली झाली एक सभा. त्यात स्त्री-पुरुष दोन्ही होते. परिषदेला गेलेल्या शेतमजूर स्त्रिया सुभद्राबाई, देवूबाई, सुवर्णा, हिरा सर्व बसल्या होत्या. सभेत असे पुरुष माणसा- शेजारी बसण्याचा पहिलाच प्रसंग. पहिला पहिला जरा घाम फुटला पण स्त्रीमुक्तीची पंढरी आठवली नी मग काय ? दणकून गजर झाला. लई दिवस काळजात रुतून बसलेले दुखणं एखाद्या प्रेशरकुकरच्या जोराने बाहेर येणाऱ्या वाफेसारखे एका दमात बाहेर पडू लागले. बाया मंडळींनी डागलेल्या या तोफा ऐकून जवळयाचा आसमंत एक इंचभर तरी एकदम वर उचलला ? चुली- पुढंच शानपन चव्हाटयावर, चावडीवर, कचेरीवर आलं नी एकदम जवळयाचा चेहरा मोहरा बदलायला सुरुवात झाली.

यापूर्वीही बाया निरनिराळया चळवळीत होत्या नाही असे नाही. पण ते कसलं ! गाडयाबरोबर मळयाची यात्रा एवढाच त्याचा अर्थ ! प्रौढ मतदान पद्धतीने होणाऱ्या निवडणुकीत फुली मारायला खंडो- बाच्या जत्रेसारखी रांग लागलेली असते पण पद्द्यात शिरेपर्यंत कुणा म्होरं फुली मारायची हे ढोसून ढोसून बाप सांगतो नी बाई शेवटी राह्यलं ध्येनात तर ठीक नाहीतर देती ठोकून कशाबी म्होरं !

### मेळावा कसला, बेलभंडारा झाला !

पुणे परिषदेचा संदेश प्रत्यक्ष व्यवहारातून द्यायचा निश्चय झाला. कार्यकर्त्या भगिनींना कल्पना आली होती की स्त्रीमुक्तीचा खरा अर्थ जर बायाच्या हृदयात भिडायचा असेल तर त्यांच्या रोजच्या जगण्याची परवड पहिली चव्हाटयावर आणली पाहिजे. "दैवात हाय त भोगलीच पायजे" यातनं त्यांना बाहेर काढायला पाहिजे. गावातल्या सगळया बायांनी ३ रुपये रोजाच्या खाली एक पै घेणार नाही म्हटल्यावर दैवाचा बा जरी आला तरी त्याला मूग गिळून गप्प बसावं लागेल.

मळी वाया जाते म्हणून दारू गाळून आपल्या "पुरुषांच्या शरीराचा सापळा नी बुद्धीचा भोपळा" करून गालेमाल होणारा साखरदार नी कराचं उत्पन्न करणारं सरकार यांना दाईमाणसांची किती पर्वा आहे ? ते काम आपणच करायला पाहिजे.

बायांचा मोठा मेळावा घेऊन त्यात या प्रश्नावर हाक द्यायचे ठरले ! ऊन नाही, तान नाही, भूक नाही. सात-सात बायांची एक टोळी अशा सात टोळया चारी दिशेला पायी निघाल्या की ! गाव आलं की, "बायांना काम मिळालंच पाहिजे ! समान नी किमान वेतन मिळालेच पाहिजे ! गळा असो नसो, आपला स्त्रीमुक्तीचा गजर सुरू ! "चल ग हिरा; चल ग मीरा, चल ग बायजाबाई ! मागं काई नाही आता तुटून उभी राही !" हळूहळू बाया आणि पुरुष गोळा व्हायचे.

### सभा कसल्या, आयाबहिणींच्या गाऱ्हाण्यांच्या पंचायतीच !

बायांची घरात दारात होणारी परवड, मजुरीत लुबाडणूक, कायम काम नाही, दारूनं झालेली संसाराची परवड, जमीन, घर, भांडीकुंडी सगळयालाच पाय फुटलेत ! कुठं पळतंय हे तर डोळयांना दिसतंय ! कष्टाची कमाई अशी लुबाडू द्यायला आपण काय मेल्या आईचे दूध प्यालो काय ? डावीकडे पुरुष, मध्ये पोर

नी उजवीकडे बाया-कान देऊन ऐकत राह्यल्या. बायांना लई काय सांगावं वाटायचं-पन समोर बापे. कधी सवय न्हाई नी पुन्ना कुनाला ठावे. रात्री ह्रानलं बिनलं तर ! बाया आमचे हात धरधरून बाजूला नेऊन गाऱ्हाणी सांगायच्या. कुणाची जमीन गेली, कुणाला रोजगार नाही, अंगभर कपडा न्हाई, मरमरेतो कष्ट करायचे नी रात्री बेकारीने, दारिद्र्याने वैतागलेल्या नवऱ्यानं, भावानं, बापानं दारू पिऊन अंगावर हात टाकायचा ! कुणाच्या डोळ्यांत पाणी, कुणाच्या डोळ्यात संताप, कुणाच्या तोंडावर अति झालं नी हास आलं असा प्रकार !

एक ठिकाणी तर जुगलबंदीच झाली. एका विडी कारखान्यात आतच सभा झाली. मध्ये पडदा एकीकडे बाया नी दुसरीकडे त्यांचेच पुरुष !

पारूनं हळूच आपला पाय दाखवला, पार बोट फुटून गेले होते. कुणाच्या डोक्याला खोक पडली होती. तिरक्या नजरेनं पड्द्या पलीकडं नवऱ्यांकडे बघत पन जरा धिटाईनं आणि रंगवून बायका गाऱ्हाणी सांगत होत्या. पडद्यापलिकडचं वातावरण अर्थात् थोडं शरमिंदं नी थोडं चिडीचं तयार झालं ! काहीजण खवळून उठलेच ! "आमच्या पैशानं आम्ही पितो, ह्यांच्या बाचं काय जातं ! नवऱ्यांची अब्रू वेशीवर टांगायला लाज नाही वाटत !"

चार-पाच जणी एकदम खवळून उठल्या. "गटारात लोळायला लाज नाही वाटत, तवा कुठं अब्रूची चाड नसती. आम्हीच दादा पुता करून उचलून आणतो न्हवं ! का तर आपलंच माणूस हाय-सुदरल उद्या. सन करायचं ! आमच्या बाचं काय जात न्हाई, खरं तुमच्या पोराचं बा तरी हाईसा का नाही ?" अर्थात् घराचा, पोराबाळांचा, शिवाय कमाई करायचा, गाडा ओढणाऱ्या बायांचा हा संताप किती रास्त आहे हे नशा उतरल्यावर त्यांनाही नेहमी पटतेच पण...आम्ही मेळाव्याचे आमंत्रण दिले नी उठलो.

आसपासच्या गावातील विडी कारखाने-कारखाने कसले, कोंबड्यांची खुराडीच ती ! मळे, रान, शाळा सगळीकडे बायांनी प्रचार केला. सभा संपली की हात वर करून, संभाळून जावा हं ! आम्ही येनार म्हंजे येनार, काळजी करू नका ! असं म्हणत शिवेपर्यंत येत होत्या, एरवी कोणताही प्रचार असो. बाया घा दारातून, फटीतून, लांबून, परक्यासारख्या ऐका पण या खेपेस ही लांबूनची, चक्रावून डोळे बारीक ऐकायची भूमिका पुरुषांकडे होती ही गोष्ट उघड दिसत होती.

## आता म बया बाई ट्रॅक्टर बी चालवतीया

रात्री ८ चे पुढे घरातले सगळे आवरून जवळचातील व आसपासचे गावातील बाया गटा घोषणा देत येत होत्या. काखेत, हाताळ्या पोरं कडाक्याची थंडी होती म्हणून घरात असेल न फाटके पांघरूण घेऊन, जरा निवांत बसून ऐका तयारीने आल्या होत्या.

मेळाव्याचे जागेजवळ एका शाळेच्या आ 'स्त्रियांच्या परिस्थितीचे' चित्रप्रदर्शन लावले पुढाकार घेणाऱ्या तरुण, शिकलेल्या मुली व बायांना बेकारीची, कनिष्ठ कामात असणारी स्त्र संख्या, हुंडा, वेश्याव्यवसाय, याची व इतर आकडे व चित्रे समजून सांगत होते. चीन, व्हिएत रशियातील लढाऊ व सर्व कामात पुढे गेलेल्या स्त्र चित्रे पाहून त्यांना आश्चर्य वाटत होते. ' आता बया, बंदुक बी हातात हाय की. ट्रॅक्टरबी चालव अन् ही गुटगुटीत पोरं कामगार शेतकऱ्याची व्हय ! आपल्याकडं कसं जमायचं हचे !

असं सगळं डोक्यात घेऊन सभा गच्च भरली. हून आलेल्या तरुण मुलींनी स्त्रीमुक्तीची गाणी केली नी कान टवकारून बाया ऐकू लागल्या. या कार्यकर्त्या भगिनींनी व बंधूंनी बायांचे प्रश्न, स्त्री व समाजपरिवर्तन या विषयांचे झगडे यांची घालणारे विचार मांडले. रोजगारहमी राबवण्या किमान वेतन मिळवून घेण्यासाठी व दारू गाव घालवून देण्यासाठी संघटित होणे किती जरूर आ अनेक स्त्रियांनी त्यांच्या जीवनातील उदाहरणे सांगितले. शेवटी,

**दारूबंदी झालीच पाहिजे, बायांना किमान व कायम काम मिळालेच पाहिजे, जो जो मागतो त्याचे पाठीत दंडा ! या घोषणांची अगदी कंठ साथ करून सभा संपली.**